अर्ज क्र.

# जिल्हा परिषद
# महिला व बाल विकास विभाग

## ------------------प्रकल्प जिल्हा------------- तील अंगणवाडयांसाठी ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळ, यांचेकडून सुक्ष्म पोषक तत्वांनी Fortification (समृध्द) केलेला Blended पोषक आहार पुरविण्यासाठीचा अर्ज

अर्जाची किंमत रु १००/- फक्त

महिला व बाल विकास विभाग,

**जिल्हा परिषद--------------जिल्हा-------------- यांचे अधिनस्त असलेल्या --------------प्रकल्पांसाठी ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळ, यांचेकडून अंगणवाडयांसाठी सुक्ष्म पोषक तत्वांनी Fortification (समृध्द) केलेला ब्लेंडेंड पोषक आहार (THR) पुरविण्यासाठीचा अर्ज**

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत--------------------------जिल्हयातील ------------ प्रकल्पातील अंगणवाडयांसाठी ६ महिने ते ३ वर्षे वयोगट, गर्भवती/स्तनदा माता, अति कुपोषित मुले तसेच सबला योजनेंतर्गत किशोरवयीन मुली यांना सुक्ष्म पोषक तत्वांनी Fortification (समृध्द) केलेला ब्लेंडेंड पोषक आहार (THR) पुरवठा करण्यासंबधी अर्ज

ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट
/महिला मंडळ :- ------------------------------------------------------

------------------------------------------------------

उपरोक्त अर्जदार यांचेकडून त्यांनी घेतलेल्या अर्जाची किंमत रु १०० /- रोख घेऊन त्यांना पावती क्र.

दि. देण्यात आलेली आहे.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक)
एकात्मिक बाल विकास सेवा योजना,
जिल्हा परिषद---------जिल्हा----

अर्ज प्राप्त करण्याचा कालावधी **दि :- १/६/२०१३ ते १५/६/२०१३**
**वेळ :- दुपारी १.०० वाजेपर्यत**

अर्ज स्विकारण्याची अंतीम तारीख व वेळ :- **दि :- १५ /०६/२०१३**
**वेळ :- दुपारी- ०३.०० वाजेपर्यत**

ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /
महिला मंडळ नांव व पत्ता :- ------------------------------------------------------

------------------------------------------------------

दुरध्वनी क्रमांक व फॅक्स क्रमांक :- ------------------------------------------------------

आम्ही उपरोक्त ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळ ---------------प्रकल्पातील अंगणवाडयांना एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत सुक्ष्म पोषक तत्वांनी Fortification (समृध्द) केलेला ब्लेंडेंड पोषक आहाराचा पुरवठा करण्यासाठी अर्जामध्ये निर्देशित केलेल्या THR संदर्भातील पाककृती पुरविण्यास तयार आहे / आहोत.

पुरविण्यात येणारा सुक्ष्म पोषक तत्वांनी Fortification (समृध्द) केलेला ब्लेंडेंड पोषक आहार हा अर्जात नमुद केल्यानुसार पॅकींग करुन पुरविण्यात येईल. सदरचे पॅकेजींग मटेरीयल हे अन्न घटक च्या पॅकींग मटेरीयल्ससाठी प्रयोगशाळेतून वापरण्यास योग्य असल्याचे प्रमाणित करण्यात येईल.

प्रस्तुत अर्जापोटी बयाणा रक्कम रु १०,०००/- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद---------- (संबधित) यांच्या नांवे काढलेला धनाकर्ष क्र. दि. सोबत जोडला आहे.

सोबत जोडलेल्या नियमावली अटी व शर्ती अर्ज करण्यापूर्वी मी / आम्ही काळजीपूर्वक वाचल्या असून नंतरच सही केलेली आहे. त्यात नमुद केलेल्या अटी व शर्ती माझा / आमचे आहार पुरवठयाचे काम संपेपर्यत माझ्यावर बंधनकारक राहतील व त्या आम्हास मान्य आहेत.

ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळातील प्राधिकृत सदस्याची सही व शिक्का

सोबत :- जोडपत्रे
दिनांक

**प्रस्तावना :-** एकात्मिक बाल विकास सेवा योजनेची अंमलबजावणी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांचेमार्फत होते. या योजनेंतर्गत ६ वर्षाखालील बालके, गर्भवती व स्तनदा माता यांना पुरक पोषण आहार, लसीकरण, संदर्भ व आरोग्य सेवा, पोषण व आरोग्य शिक्षण, आरोग्य तपासणी इ. सेवा दिल्या जातात. तर ३ वर्षे ते ६ वर्षे वयाच्या मुलांना अनौपचारीक शिक्षण दिले जाते.

पुरक पोषण आहार कार्यक्रमाबरोबरच वाढीचे संनियंत्रण व विकास, अतिरीक्त पोषण पुरवठा इत्यादी बाबीचा देखील या योजनेत अंतर्भाव केलेला आहे. मुलांचा एकंदरीत पोषण दर्जा वाढविणे, आणि त्यांचा विकास घडवून आणणे या महत्वाच्या बाबींच्या पुर्ततेच्या दृष्टीने केंद्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केल्यानुसार अन्न सुरक्षितता व आहाराचा दर्जा व गुणवत्ता सुधारण्याच्या दृष्टीने आवश्यक बाबींचा अंर्तभाव वेळोवेळी योजनेत करण्यात येतो. त्या अनुषंगाने केंद्र शासनाने दि. २४/२/२००९ रोजी सर्व समावेश व सर्वव्यापक आदेश निर्गमित केला आहे.

**कामाची संकल्पना व व्याप्ती :-** एकात्मिक बाल विकास सेवा योजनेत असलेल्या लाभार्थ्यांना पोषक तत्वयुक्त आहार मिळण्याच्या अनुषंगाने केद्रशासनाच्या दि. २४/२/२००९ च्या शासन निर्णयानुसार पोषणाचे निकष बदलण्यात आलेले आहेत. केद्रशासनाच्या निर्णयात नमुद केल्यानुसार सुक्ष्म पोषक तत्वांनी Fortification (समृध्द) केलेले ब्लेंडेड पदार्थ Take Home Ration च्या स्वरुपात अंगणवाडीपर्यत पोहच करावयाचे आहे.

याबाबत मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी दि. ७/१०/२००४ रोजी पुढील प्रमाणे निर्णय दिलेला आहे.

**The contractors shall not be used for supply of nutrition in Anganwadis and preferably ICDS funds shall be spent by making use of village communities, self-help groups and Mahila Mandals for buying of grains and preparation of meals.**

सदर निर्णयाच्या अधिन राहुन ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळ यांचेकडून THR आहार पुरवठयाचे अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अर्जदारांना सुचना**

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय आहार समिती जिल्हा-----------------हे सुक्ष्म पोषक तत्वांनी Fortification (समृध्द) केलेले प्रिमिक्स पुरवठयासाठी ---------------**प्रकल्पासाठी** अर्ज मागवित आहेत.

***एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत-------------प्रकल्पातील प्रत्येक अंगणवाडी पातळीवर सुक्ष्म पोषक तत्वांनी Fortification (समृध्द) केलेला ब्लेंडेड पोषक आहार (THR) पुरवठा करण्याबाबत अटी व शर्ती***

१) अर्ज उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक), जिल्हा परिषद----------जिल्हा----------- यांचे कार्यालयात दि. १५/६/२०१३ रोजी दुपारी १५.०० वाजेपर्यत किंवा त्यापुर्वी स्विकृत केले जातील. अशा तऱ्हेने प्राप्त अर्ज दि- १६/०६/२०१३ रोजी दुपारी- १६.०० वाजता किंवा जिल्हाधिकारी यांना सोयीस्कर कामाच्या दिवशी तपासण्यात येतील. अर्जधारक किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी अर्ज तपासणीचे वेळी हजर राहू शकतील.

२) कोणताही अर्ज अथवा सर्व अर्ज कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा स्तरीय समिती यांनी राखुन ठेवला आहे.

३) वेळोवेळी पाककृतीत बदल करण्याबाबत आयुक्त, महिला बाल विकास सेवा योजना, पुणे यांचे स्तरावरुन निर्देश देण्यात येतील.

**अर्ज भरावयाची पध्दत**

तांत्रिक अर्हतेच्या संदर्भात दस्तऐवजांची पुर्तता अर्ज सादर करतांनाच पुर्ण करणे आवश्यक आहे. अर्जाचा लिफाफा उघडल्यानंतर त्यातील दस्तऐवजांच्या आधारे अर्जदारांची पात्रता ठरविण्यात येईल. अर्ज उघडल्यानंतर ऐनवेळी कोणताही दस्तऐवज स्विकारण्यात येणार नाही. अर्जासोबत सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रमाणित केलेल्या सत्यप्रती/ छायांकित दस्तऐवजांच्या प्रती जोडाव्यात. **तांत्रिक अर्हतेच्या तपशीलात नमुद केलेल्या अर्हतेपेक्षा कमी अर्हता आढळल्यास अर्जदार अपात्र होतील.**

**तांत्रिक अर्हता :-**

४) अर्जाच्या प्रत्येक पानावर अर्जदाराने अटी व शर्ती मान्य असल्याबाबत सही व शिक्का असावा.

५) अर्जाची फी रु १००/- भरल्याबाबतची शासकीय पावती अर्जासोबत जोडावी. सदर अर्ज संकेत स्थळावरुन (web site) घेतला असल्यास रु १००/- चा मुख्य वित्त व लेखा अधिकारी जिल्हा परिषद ------------- (संबधित) यांचे नांवे असलेला धनाकर्ष जोडावा, अन्यथा अर्ज ग्राहय धरला जाणार नाही.

६) बयाणा रक्कम रु १००००/-चा धनाकर्ष राष्ट्रीयकृत बॅकेत काढण्यात यावा. या रक्कमेवर व्याज दिले जाणार नाही. सदर धनाकर्ष मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद----------(संबधित) यांचे नांवे असावा.

७) बचत गटामध्ये किमान १० व कमाल २० महिला सदस्य असाव्यात.

८) निविदा प्रसिध्द केल्याच्या दिनांकास बचत गट सुरु होऊन २ वर्षे पुर्ण होणे आवश्यक आहे.

९) बचत गटातील महिला नियमित मासिक बचत करणे आवश्यक आहे.

१०) बचत गटातील महिलांची मासिक बैठकीस उपस्थिती समाधानकारक असणे आवश्यक आहे.

११) बचत गटाने बॅकेंचे खाते उघडलेले असावे व त्याचा आर्थिक व्यवहार सुरळीत असावा.

१२) अर्ज करतेवेळी बचत गटाने बॅकेच्या पासबुकची झेरॉक्स जोडावी.

१३) बचत गट हे नोंदणीकृत असण्याची आवश्यकता नाही.

१४)बचत गटाकडे आहार पुरवठयाचे काम मिळाल्यानंतर लगेचच त्यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाचा परवाना काढणे बंधनकारक राहील.

१५) महिला मंडळ यांची विहीत पध्दतीने नोंदणी झालेली असावी.

**१६) ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळ स्थानिक असणे आवश्यक आहे.**

१७)**एका ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळास एकाच प्रकल्पात काम करता येईल.** एखाद्या जिल्हयात एखाद्या प्रकल्पाकरिता एकही पात्र ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळ आढळून आला नाही तर अशा परिस्थितीत जिल्हयातील इतर प्रकल्पातील या साठी पात्र ठरलेल्या ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळास त्याची क्षमता तपासून अशा प्रकारच्या आहार पुरवठयाचे काम देण्यासाठीचे अधिकार निवड समितीस असतील. परंतु अतिरिक्त एका प्रकल्पापेक्षा जास्त प्रकल्पाचे काम सदर ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळास देता येणार नाही.

१८) अर्ज दाखल करतानाच सर्व कागदपत्रे ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळ यांनी सादर करावीत. अपुर्ण अर्ज व योग्य कागदपत्रे नसलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच नंतर स्विकारले जाणार नाहीत.

**१९) निविदा अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे.**

a. ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळामध्ये किमान १० व कमाल २० महिला सदस्य असाव्यात. यादी जोडावी.

b. महिला मंडळाची नोंदणी झाल्याचे प्रमाणपत्र

c. निविदा प्रसिध्द केल्याच्या दिनांकास महिला स्वयंसहाय्यता बचत गट सुरु होऊन २ वर्षे पुर्ण झाल्याचे बँक पासबुकाची छायांकित प्रत जोडावे.

d. ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळातील महिला नियमित मासिक बचत करणे आवश्यक आहे. (मागील ६ महिन्यांची बॅक पासबुकाची छायांकित प्रत)

e. ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळातील महिलांची मासिक बैठकीस उपस्थिती समाधानकारक असणे आवश्यक आहे. (मागील ३ महिने बैठकीचे इतिवृत्त जोडावे.)

f. बचत गटाने बॅकेंचे खाते उघडलेले असावे व त्याचा आर्थिक व्यवहार सुरळीत असावा.

g. ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळाकडे आहार पुरवठयाचे काम मिळाल्यानंतर लगेचच त्यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाचा परवाना काढणे बंधनकारक राहील.

h. अर्जामध्ये पुढील बाबी स्पष्ट नमुद केलेल्या असाव्यात. सदर युनिट दैनदिन चालवणाऱ्या जबाबदार व्यक्तीची नांवे व सविस्तर माहिती उदा. प्रिमिक्सचा पुरवठा तांत्रिकतेनुसार नियमित होणे, PFA ( Prevention of Food Adulteration Act) व IFA (Integrated Food Laws.) या कायद्याचे उल्लंघन होणार नाही याची जबाबदारी दिलेल्या व्यक्ती, बॅकेचे खाते चालविणाऱ्या व्यक्तींची माहिती, मुख्य कार्यकारी अधिकारी / नागरी प्रकल्प कार्यालयातील बैठकांना उपस्थित राहणाऱ्या व्यक्तीची नांवे, इतर कायदेविषयक बाबी लागू असल्यास वरील कार्यवाही करणाऱ्या सर्व सदस्यांजवळ प्राधिकृत असलेले पत्र असावे.

i. प्रत्येक सदस्याचे संपूर्ण नांव, पत्ता, पद, स्वयंसहाय्यता बचत गट, गोडाऊनची उपलब्धता, साठवणूकीची क्षमता, वितरण व्यवस्था, वाहतूक व्यवस्था, बॅक खाते, याची माहिती जोडावी.

j. Shelf life Certificate (आहार चांगल्या स्थितीत राहण्याचा कालावधी) :- सामान्य परिस्थितीत प्रिमिक्स आहार कमीत कमी २ महिने Shelf life असल्याबाबत अर्जदाराचे स्वतःच्या सहीचे प्रमाणपत्र

k. अर्जदार ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळ यांना स्वखर्चाने २ ते ३ महिने आहार पुरवठा करण्याची क्षमता असावी. त्यांचेकडे अर्ज सादर करतेवेळी रु ३,००,०००/- रक्कम शिल्लक असावी. बॅक बॅलन्सची झेरॉक्स प्रत

l. ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळ यांचेकडे स्वतःची किंवा भाडयाची वाहतूक व्यवस्था असणे आवश्यक आहे तसेच अंगणवाडी केंद्रावर वेळेवर आहार पुरवठयाची करण्याची जबाबदारी राहील. जर भाडयांने वाहतुक व्यवस्था घेतली असेल तर त्याबाबतचा वाहन मालकाशी केलेला करारनामा जोडणे आवश्यक राहील.

२०) **उत्पादन केंद्र :-** ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळाने स्वतःचे मालकीच्या किंवा भाडयाने / कराराने घेतलेल्या जागेवर स्वतः THR आहार उत्पादन करणेसाठी यंत्र सामुग्री युक्त उत्पादन केंद्र प्रस्थापित केलेले असावे, उत्पादनासाठी आवश्यक असलेली यंत्रसामुग्री ही स्वतःच्या मालकीची असणे आवश्यक आहे. जर स्वतःचे मालकीचे THR आहार उत्पादन केंद्र नसल्यास व सदर ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळ हे सर्व कायदेशीर बाबी पुर्ण करीत असल्यास त्यास काम देण्यापुर्वी त्याने स्वतःचे मालकीचे THR आहार उत्पादन केंद्र स्थापन करण्याची तयारी दर्शविल्यास त्यास काम देणे बाबत विचार करता येईल. उत्पादन केंद्र ज्या प्रकल्पासाठी पुरवठा होणार आहे, त्या जिल्हयातच असणे आवश्यक आहे. जर प्रकल्पात असेल तर त्यास प्राधान्य देण्यात येईल.

**२१) कोणत्याही प्रकारे उत्पादक, ठेकेदार, व्यावसायिक, मध्यस्थ, वितरक, डिलर अशा व्यक्ती व व्यक्तींचे समुह अर्ज करण्यास पात्र ठरणार नाहीत.**

२२) **आहाराची तपासणी-** शासन निर्णय क्र. एबावि-२०१२/ प्र.क्र. ३८८/ का-५ दि. ३१/१०/२०१२ अन्वये **माता समितीची** स्थापना करण्यात आलेली आहे. सदर समिती शिजवून पुरविण्यात (Hot Cook Meal) येणाऱ्या आहाराची वेळोवेळी तपासणी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेली आहे. या समितीकडून THR ची पाहणी करण्यात येऊन त्याची खात्री करावी. तसेच सदर शासन निर्णयात नमुद केल्या प्रमाणे लाभार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या आहाराचा दर्जा चांगला असावा. अंगणवाडी केंद्रातील पुरक

पोषण आहाराची अचानकपणे प्रयोगशाळेतून तपासणी करण्यात येईल. तसेच पुरविण्यात येणाऱ्या THR आहारामुळे लाभार्थ्यांना विषबाधा, उलटया किंवा मळमळ होणे इ. सारख्या गंभीर घटना घडल्यास तसेच आहारामध्ये अळया, किडे इ. आढळून आल्यास अशावेळी त्या पोषण आहाराचे नमुने जवळच्या मान्यताप्राप्त प्रयोगशाळेतून तपासून घेण्यात येईल. याबाबतचा सर्व खर्च बचत गटास करावा लागेल. आहाराच्या नमुन्याची तपासणी केल्यानंतर दंडात्मक कार्यवाही शासन निर्णय क्रमांक एबावि २००८/प्रक्र५९/का५/ दिनांक २४ ऑगस्ट २००९ मधील मुद्दा क्र. ३.११ नुसार करण्यात येईल.

**२३)दंडात्मक कारवाई :-**

आहार पुरवठादार ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळाने जितक्या अंगणवाडयांना, जितक्या कालावधीसाठी आहार पुरवठयात खंड पाडलेला असेल, तेवढेच अंगणवाडयांच्या बाबतीत आणि आहारात खंड पडलेल्या दिवसांसाठी दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

२४) ज्या ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळाच्या बाबतीत अशा प्रकारची दंडात्मक कार्यवाही तीन वेळा होईल अशा ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळांवर प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल.

२५)शासनाने ठरवून दिलेल्या प्रति लाभार्थी प्रति दिन अनुज्ञेय दराने, सुधारित प्रमाणकानुसार तसेच शासनाने ठरविलेल्या पाककृतीनुसार THR आहार पुरवठा करण्यास तयार असून त्याबाबत आम्ही ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळ बांधील आहोत असे हमीपत्र अर्जदार ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळ यांना दयावे लागेल.

२६) दि. २४/८/२००९ च्या शासन निर्णयानुसार ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळाने मायक्रोन्युट्रीयन्ट (सुक्ष्म पोषण तत्व युक्त ) आहारा चा पुरवठा करण्याची लेखी हमी द्यावी लागेल.

२७) ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळ यांचेकडे स्वतःची किंवा भाडयाची वाहतूक व्यवस्था असणे आवश्यक आहे तसेच अंगणवाडी केंद्रावर वेळेवर आहार पुरवठयाची करण्याची जबाबदारी राहील. जर भाडयांने वाहतुक व्यवस्था घेतली असल्यास त्याबाबतचा करारनामा जोडणे आवश्यक राहील.

२८)अन्नामध्ये कुठल्याही प्रकारची भेसळ आढळून आल्यास/जिवितास धोकादायक पदार्थ असल्यास अन्न व औषध भेसळ प्रतिबंधक कायद्यांतर्गत ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळ हे कार्यवाहीस पात्र राहतील.

**२९)तांत्रिक अर्हता पुर्ण केलेल्या पात्र ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळ याचे उत्पादन केंद्राची तपासणी करण्यात येईल. या तपासणीसाठी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली असलेल्या जिल्हास्तरीय समिती मार्फत तपासणी करण्यात येईल.**

३०)ज्या पात्र ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळ यांना आहार पुरवठयाचे काम दिले जाईल त्यांनीच आहार पुरवठा करावा. कोणत्याही परिस्थितीत त्रयस्थ संस्था / व्यक्ती / उप पुरवठादार यांचेद्वारे पुरवठा केल्यास संबधित ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळांचे पुरवठयाचे काम बंद करण्यात येईल. याबाबत पुर्ण अधिकार जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय आहार समिती यांना राहतील. सदर प्रकरणात निर्णय न झाल्यास आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांचा निर्णय अंतीम राहील.

३१) पॅकींग सामुग्री ही चांगल्या दर्जाची असावी.

३२) आहाराची शेल्फ लाईफ किमान २ महिने असावी.

३३) आहाराचा पुरवठा एकाच वेळी २५ दिवसांच्या कालावधीकरिता करणे बंधनकारक राहील.

३४) निवड झालेल्या ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळांना शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णय, परिपत्रक तसेच आयुक्तालयाच्या सूचना, आदेश, परिपत्रके, आहारात सुधारणा व बदल बंधनकारक राहतील.

**३५)** **अ)** प्रत्येक पाककृतीचे ४ नमुने प्रत्यक्ष उत्पादन सुरु करण्यापूर्वी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) / बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांचेकडे सादर करण्यात यावेत. तसेच प्रथीने व कॅलरीज, तसेच सुक्ष्म पोषक तत्वाचे प्रमाण हे विहीत केलेल्या तांत्रीक दर्जाप्रमाणे असल्याचे प्रयोगशाळेचे विश्लेषण अहवाल जोडणे आवश्यक राहील.

**ब) प्रिमिक्सची NABL (National Accreditation Board for Calibration and Testing Laboratory) च्या मान्यताप्राप्त प्रयोगशाळेतून तपासणी** :- PFA च्या कायद्यात दिलेल्या व अर्जाच्या नमुन्यात दिल्यानुसार असणे आवश्यक आहे.

a. पोषक घटकांचे प्रमाण

**b.** जीवाणुचे प्रमाण व रासायनीक भेसळ अथवा दुषितीकरण

**c.** भौतिक स्थिती उदा. कोरडेपणा, मऊपणा, पोत

**d.** सुक्ष्मपोषक घटकांचे प्रमाण.

३६) पदार्थाचे नमुने Technical Specification नुसार असणे आवश्यक आहे.

**३७)** **पॅकेजिंग मटेरियल प्रयोगशाळा अहवाल :-** THR आहाराचे वाटप करण्यापूर्वी NABL च्या प्रयोगशाळेने मान्य केलेल्या प्रयोगशाळेतून पॅकेजिंग मटेरियल बाबत अहवाल सादर करणे आवश्यक राहील. तसेच पॅकेजिंग मटेरियल हे Food Grade पॅकींग मटेरियल असल्याबाबत तसेच जीवाणू व अपायकारक रासायनिक घटक यांचेपासून मुक्त असल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

३८) पुरवठा करण्यात येणाऱ्या आहाराचे (THR) Shelf life कमीत कमी ६० दिवस आहे. राज्यातील दुर्गम भागातील अंगणवाडयापर्यंत आहाराचा पुरवठा करावयाचा असल्याने उत्पादीत आहाराची गुणवत्ता व दर्जा उत्तम रहावा त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी वेळोवेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क), आयुक्त कार्यालयातील अधिकारी तसेच संबधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचेमार्फत आहाराची (THR) तथा उत्पादन केंद्राची वेळोवेळी तपासणी करण्यात येईल. बालकांना आहार द्यावयाचा असलेने तो दर्जेदार व चांगल्या प्रतीचा असणे आवश्यक आहे.

३९) अर्जदार ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळ, यांनी प्रकल्पासाठी चारही पाककृतींनुसार अर्ज सादर करणे अनिवार्य आहे. चार पाककृतींपैकी फक्त एक, दोन किंवा तीन पाककृतीनुसार अर्ज भरला असेल असा अर्ज रद्द करण्यात येईल.

४०) **करारनामा :-**

पुरवठयासंबधि अटी व शर्ती बाबतचा करारनामा रु १००/- (रुपये शंभर फक्त) च्या स्टँप पेपरवर करुन देणे आवश्यक राहील.

४१) अर्जावर कोणतेही कारण न देता स्विकारणे अथवा नाकारण्याचे सर्व अधिकार जिल्हास्तरीय समितीकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

**४२)** **ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळ वरील प्रमाणे गुंतवणूक करणार असल्याने त्यांना THR पुरवठयाचे काम ३ वर्षासाठी देण्यात येईल. परंतु याबाबत ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळ यांच्या कामाचा आढावा आयुक्तालयामार्फत दरवर्षी (३ वर्षापर्यंत) घेऊन THR आहार पुरवठयाचे काम समाधानकारक असल्यास मुदतवाढ देण्यात येईल. यासाठी प्रत्येक वर्षी नवीन करारनामा करणेत येईल.**

४३) सदर बाबतचा अंतीम अधिकार आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहतील.

४४) निविदेअंती ज्या बाल विकास प्रकल्पात दि. २४/८/२००९ च्या शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळ यांचेमार्फत THR पुरवठा करण्यासाठी आर्थिक दृष्टया सक्षम, त्यांच्याकडे आवश्यक ती यंत्र सामुग्रीसह पात्र आढळून आल्यास, तशा ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळांच्या पात्रतेविषयी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समिती योग्य चौकशी करुन एका सर्वोत्तम महिला बचत गटाची निवड करेल व त्यांना काम देण्यात येईल.

४५) सर्वसाधारण प्रकल्पांना खालील प्रमाणे आहाराचा दर व प्रमाण बंधनकारक राहील

**आहाराचा दर व प्रमाण :-**

| अ.क्र. | लाभार्थी प्रकार | आहाराचे प्रमाण व स्वरुप | प्रति दिन प्रति लाभार्थी आहाराचे दर | पुरक पोषण आहाराचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| १ | ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील लाभार्थी | ५०० उष्मांक आणि १२ ते १५ ग्रॅम प्रथिने | रु ४.९२ | THR आहार (पाककृतीनुसार) |
| २ | ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील तीव्र कमी वजनाचे लाभार्थी | ८०० उष्मांक आणि २० ते २५ ग्रॅम प्रथिने | रु ६.९२ | THR आहार (पाककृतीनुसार) |
| ३ | गरोदर व स्तनदा माता | ६०० उष्मांक आणि १५ ते २० ग्रॅम प्रथिने | रु ५. ९२ | THR आहार (पाककृतीनुसार) |
| ४ | किशोरवयीन मुली (सबला योजेंतर्गत ११ जिल्हयातील प्रकल्पांसाठी) | ६०० उष्मांक आणि १५ ते २० ग्रॅम प्रथिने | रु ५. ०० | THR आहार (पाककृतीनुसार) |

४६) राज्यातील आदिवासी क्षेत्रातील १५ आदिवासी तालुक्यामध्ये नवसंजीवन योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांना अतिरिक्त आहार देण्यात येतो. त्यासाठी त्याचे दर व प्रमाणे खालील प्रमाणे राहतील.

| अ.क्र. | लाभार्थी प्रकार | आहाराचे प्रमाण व स्वरुप | प्रति दिन प्रति लाभार्थी आहाराचे दर | पुरक पोषण आहाराचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| १ | ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील लाभार्थी | ६०० उष्मांक आणि १५ ते २० ग्रॅम प्रथिने | रु ५.९२ | THR आहार (पाककृतीनुसार) |
| २ | ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील तीव्र कमी वजनाचे लाभार्थी | ९५० उष्मांक आणि २४ ते २८ ग्रॅम प्रथिने | रु ८.९२ | THR आहार (पाककृतीनुसार) |
| ३ | गरोदर व स्तनदा माता | ८०० उष्मांक आणि २० ते २५ ग्रॅम प्रथिने | रु ७. ९२ | THR आहार (पाककृतीनुसार) |
| ४ | किशोरवयीन मुली (सबला योजेंतर्गत ११ जिल्हयातील प्रकल्पांसाठी) | ६०० उष्मांक आणि १५ ते २० ग्रॅम प्रथिने | रु ५. ०० | THR आहार (पाककृतीनुसार) |

वरील दरात व प्रमाणकामध्ये शासनाने वेळोवेळी केलेले बदल आपोआप लागू राहतील.

४७) पाककृती :-

**६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील लाभार्थ्यासाठी पाककृती १**

| अ.क्र | तपशील | ग्रॅम | उष्मांक | प्रथिने |
|---|---|---|---|---|
| १ | गहु | ८० ग्रॅम | २७२.८० | ९.६० |
| २ | चणा (भाजलेला) | २५ ग्रॅम | ९२.२५ | ५.५० |
| ३ | साखर | ३५ ग्रॅम | १३९.३० | ० |
| | सुक्ष्म पोषक तत्वे (Micronutrient) | शा. निर्णय दि. २४/८/२००९ नुसार लागू राहतील | ० | ० |
| | **एकुण** | **१४० ग्रॅम** | **५०४.३५** | **१५.१** |

**६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील लाभार्थ्यासाठी पाककृती २-**

| अ.क्र | तपशील | ग्रॅम | उष्मांक | प्रथिने |
|---|---|---|---|---|
| १ | गहु | ९० ग्रॅम | ३०६.९० | १०.८० |
| २ | सोया चंक ( सोयावडी ) | १० ग्रॅम | ४३.२० | ४.३० |
| ३ | शेंगदाणे | ५ ग्रॅम | २८.३५ | १.२५ |
| ४ | गुळ | ३५ ग्रॅम | १३४.०५ | ० |
| | सुक्ष्म पोषक तत्वे (Micronutrient) | शा. निर्णय दि. २४/८/२००९ नुसार लागू राहतील | ० | ० |
| | **एकुण** | **१४० ग्रॅम** | **५१२.५** | **१६.३५** |

**गरोदर स्त्रिया व स्तनदा माता पाककृती १**

| अ.क्र | तपशील | ग्रॅम | उष्मांक | प्रथिने |
|---|---|---|---|---|
| १ | गहु | ७८ ग्रॅम | २६५.९८ | ९.३६ |
| २ | सोया चंक ( सोयावडी ) | १२ ग्रॅम | ५१.८४ | ५.१६ |
| ३ | चणा (भाजलेला) | ३० ग्रॅम | ११०.७० | ६.६० |
| ४ | गुळ | ४५ ग्रॅम | १७२.३५ | ० |
| | सुक्ष्म पोषक तत्वे (Micronutrient) | शा. निर्णय दि. २४/८/२००९ नुसार लागू राहतील | ० | ० |
| | **एकुण** | **१६५ ग्रॅम** | **६००.८७** | **२१.१२** |

**पाककृती २**

| अ.क्र | तपशील | ग्रॅम | उष्मांक | प्रथिने |
|---|---|---|---|---|
| १ | गहु | ९२ ग्रॅम | ३१३.७२ | ११.०४ |
| २ | सोया चंक ( सोयावडी ) | २० ग्रॅम | ८६.४० | ८.६० |
| ३ | शेंगदाणे | ८ ग्रॅम | ४५.३६ | २ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | साखर | ४० ग्रॅम | १५९.२० | ० |
| | सुक्ष्म पोषक तत्वे (Micronutrient) | शा. निर्णय दि. २४/८/२००९ नुसार लागू राहतील | ० | ० |
| | **एकुण** | **१५१ ग्रॅम** | **६०४.६८** | **२१.६४** |

टिप :- दि. २४/८/२००९ चा शासन निर्णय तसेच सर्व परिपत्रके, आयुक्तालय, महिला व बाल विकास, पुणे यांचे वेबसाईट क्र. www.icds.gov.in यामध्ये News या सदराखाली टाकण्यात आलेले आहे.

**अंतिम निविड झालेल्या ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळांनी पूर्ण करावयाच्या अटी व शर्ती**

१) अर्जामध्ये नमुद केल्यानुसार सर्व तांत्रिक बाबींची पुर्तता केल्यानंतरच तपासणी समिती संबधित युनिटला भेट देतील.

२) तपासणी अंतर्गत खालील गोष्टी अंतर्भुत आहेत.

- मशिनरीची यादी देणे आवश्यक आहे. तपासणीच्या वेळेस यंत्र सामुग्री आढळली नाही वा यंत्र सामुग्री चालू स्थितीत नसेल तर उत्पादन केंद्र अयोग्य ठरविण्यात येईल. तपासणीच्या वेळी मशिनरी खरेदीची मुळ बीले दाखविणे आवश्यक राहील.
- अर्जामध्ये जोडलेल्या कागदपत्रांवरुन मुळ कागदपत्रांची पाहणी करण्यात येईल.
- साठवणूकीची क्षमता, वितरण व्यवस्था, वाहतूक व्यवस्था, उत्पादनासाठी उपलब्ध असणाऱ्या तांत्रिक व्यक्तींची उपलब्धता याची तपासणी करण्यात येईल.

३) अर्ज मंजूर झाल्यास अर्जधारकास आवश्यक तो करारनामा रु १०० रक्कमेच्या स्टॅम्पपेपरवर त्यांचे खर्चाने ठरवून दिलेल्या नमुन्यामध्ये पुरवठा आदेश देण्यापूर्वी सादर करावा लागेल.

४) पात्र ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळ यांना जिल्हास्तरीय समितीमार्फत काम दिल्यानंतर पुनश्च संबधित उप मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी ) यांचेमार्फत उत्पादन केंद्र स्थापन झाल्यानंतर तपासणी करण्यात येईल.

- तपासणीच्या वेळी उत्पादन क्षमता
- पदार्थाचा तांत्रिक दर्जा (अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे)
- पाककृतीची चव व स्वीकार्यहारता तपासण्यात येईल.
- उत्पादनाला लागणारी स्वच्छता, हायजिन, मनुष्यबळ यांची तपासणी
- स्वच्छ, ताजा, चांगल्या दर्जाच्या अन्न धान्यापासुन आहार तयार केलेला असावा. त्यामध्ये शरिरास अपायकारक घटक व इतर बाबी नसाव्यात. कीड अथवा बुरशी लागलेले अन्नधान्य नसावे.
- अन्न भेसळ प्रतिबंधक कायदयांन्वये निश्चित केलेल्या प्रमाणानुसार अन्न धान्याचा वापर असावा.
- पाककृती तयार करण्यासाठी खरेदी केलेले अन्नधान्य कोरडया, हवेशीर व स्वच्छ जागी साठवाव्यात.
- किटकनाशके अथवा Fumigation (फवारणी) चे प्रमाण धोकादायक नसावे. किटकनाशकांचा वापर देखील PFA तील प्रमाणकानुसार असावा.
- उत्पादनाची पध्दती बाल आहारासाठी स्वच्छ व आरोग्यदाई असावी.
- पाककृती निर्देशाप्रमाणे असाव्यात.
- अर्जदाराकडे सुक्ष्म पोषक तत्वांनी Fortification (समृध्द) केलेले फोर्टिफाईड ब्लेंडेड प्रिमिक्स रोस्टेड पध्दतीने आहार तयार करण्यासाठी उपलब्ध मशीनरी व प्लँट असणे आवश्यक आहे. धान्य

सफाई करण्यासाठी क्लींनिग मशीन (चालना), खडे वेगळे करणेसाठी ड्रीस्टोनर, पल्वलायझर, रोस्टर, ब्लेंडर, व ॲल्युमिनीयम स्ट्रे, पॅकींग मशीन असणे आवश्यक आहे.

- पाककृतीमध्ये अन्न घटक, अन्न धान्य उदा. गहु, सोयाबीन, इ. सुक्ष्म पोषक तत्वांनी Fortification (समृध्द) केलेला ब्लेंडेड केलेले असावे.

५) प्रिमिक्स वाटपाचे (प्रति दिन प्रति लाभार्थी ) परिमाण केंद्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार व प्रति लाभार्थी दरानुसार आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे हे ठरवतील. सदर ठरवून दिलेल्या परिमाणानुसार आहाराचे पॅकींग अंगणवाडी स्तरापर्यत पोहच करावे लागेल.

६) पात्र ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळांकडून एकुण पुरवठा आदेशाच्या २ % किंवा रु १.०० लाख सुरक्षा अनामत रक्कम बॅक गॅरंटी/ धनाकर्ष या स्वरुपात जमा करावी लागेल. सदर जमा करण्यात आलेली सुरक्षा अनामत रक्कम संपुर्ण पुरवठयाचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर उत्पादकाबद्दल कोणतीही तक्रार नसली तर सहा महिन्याच्या कालावधीनंतर क्षतीपूर्ती बंद पत्र प्राप्त करुन घेतल्यानंतर परत करण्यात येईल. व शासनाकडून सुरक्षा अनामत रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देण्यात येणार नाही.

७) ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळाने प्रकल्प अधिकारी यांनी ठरवून दिलेल्या वेळापत्रक व मागणीप्रमाणे सुक्ष्म पोषक तत्वांनी Fortification (समृध्द) केलेला ब्लेंडेंड पोषक आहाराचा पुरवठा अंगणवाडीच्या वेळेनुसार सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेच्या कालावधीतच करावयाचा आहे. इतर कालावधीत पुरवठा केल्यास तो कोणत्याही परिस्थितीत स्विकारण्यात येणार नाही. मालाची वाहतुक करणाऱ्या वाहनात प्रमाणीत वजन काटा ठेवला पाहिजे. व प्रत्यक्ष माल गावातील योग्य त्या पंचासमोर वजन करुन दिला पाहिजे. व तसे केल्याबद्दल संबधीतांची पोच घेतली पाहिजे. ग्रामीण, आदिवासी व नागरी भागात भागात पंच म्हणजे अंगणवाडी सेविका, माता समितीतील सदस्य- लाभार्थी माता / लाभार्थ्याची आई.

८) ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळाला अंगणवाडी केंद्रापर्यत पुरवठा करण्यात येणाऱ्या आहारासंबधी पावत्या प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील. त्याकरिता अनुक्रमांक असलेल्या तीन प्रकारच्या तीन रंगाच्या पावत्या छापाव्या लागतील. १) गुलाबी २) पिवळी व ३) पांढरी, गुलाबी रंगाची पावती बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचेकडे असेल. पांढऱ्या रंगाची पावती अंगणवाडी केंद्रावर व पिवळया रंगाची पावती महिला स्वयंसहाय्यता बचत गटाकडे त्यांची स्वतःची प्रत म्हणून राहील. पावतीवर प्रकल्पाचे नांव, पुरवठयाचा दिनांक, आहाराचा प्रकार, आहाराचे वजन, वाहन क्रमांक, मालाची वाहतुक करणाऱ्याचे नांव, पावती क्रमांक इत्यादी तपशील असेल. पावती पुस्तक पुरवठादार स्वतःचे खर्चाने छापून घेईल.

९) अंगणवाडयांना सुक्ष्म पोषक तत्वांनी Fortification (समृध्द) केलेला ब्लेंडेंड पोषक आहाराचा प्रत्यक्ष पुरवठा करण्यापूर्वी महिला स्वयंसहाय्यता बचत गटांनी सदर आहाराचे बॅचनिहाय नमुने NABL प्रयोगशाळेतून स्वखर्चाने तपासून घ्यावेत. प्रत्यक्ष पुरवठा सुरु होण्यापूर्वी उत्पादन केंद्राची तपासणी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांच्या कार्यालयाने नेमलेल्या समितीमार्फत करण्यात येईल. बाल विकास प्रकल्प अधिकारी / उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण) किंवा आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांनी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास अंगणवाडयांमधून आकस्मितपणे रोस्टर पध्दतीने व सुक्ष्म पोषक तत्वांनी Fortification (समृध्द) केलेला पोषक आहाराचे नमुने तपासणीसाठी मान्यताप्राप्त NABL प्रयोगशाळेत / अन्न व पोषण मंडळाकडे पाठविण्याचे अधिकार राहतील.

१०) सुक्ष्म पोषक तत्वांनी Fortification (समृध्द) केलेला ब्लेंडेंड पोषक आहाराचा पुरवठा २ महिन्यासाठी राहील. मुख्य कार्यकारी अधिकारी / बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्या मागणीनुसार पुरवठा करावा लागेल. प्रत्येक पुरवठा सुरु करण्यापूर्वी पुरवठयाचे वेळापत्रक संबधीत बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना कळविले पाहिजे. सुक्ष्म पोषक तत्वांनी Fortification (समृध्द) केलेला ब्लेंडेंड पोषक आहाराची वाहतुक योग्य व काळजीपूर्वक संबधीत अंगणवाडयांपर्यत करण्याची जबाबदारी महिला स्वयंसहाय्यता बचत गटांची राहील व वाहतुकी दरम्यान मालाची नासधूस / हानी झाल्यास माल बदलून देण्याची संपूर्ण जबाबदारी महिला स्वयंसहाय्यता बचत गटांवर राहील.

११) पुरवठा करावयाच्या बॅगवर अन्न व औषध प्रशासन कायद्याप्रमाणे उत्पादनाचा दिनांक, बॅच क्रमांक, मुदतबाहय तारीख (एक्सपायरी डेट) व आहारातील असलेले पोषण मुल्य आहाराच्या प्रकारानुसार लाभार्थ्याच्या एका

feeding मध्ये किती आहे तसेच प्रति लाभार्थीनुसार feeding चे प्रमाण इत्यादी तपशील छापील स्वरुपात नमुद करावा लागेल. तसेच सदरहु सुक्ष्म पोषक तत्वांनी Fortification (समृध्द) केलेला ब्लेंडेड पोषक आहाराचा पुरवठा केवळ एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्यासाठी आहे. विक्रीसाठी नाही असे स्पष्ट नमुद करावे लागेल.

१२) पुरवठा कालावधीत दर इत्यादी तपशीलात वेळोवेळी वाढ अथवा बदल झाल्यास त्यानाही हयाच अर्जातील अटी व शर्ती आपोआपच लागू होतील.

१३) निष्कृष्ठ दर्जाचा माल पुरविल्यामुळे, उशिरा माल पुरविल्यामुळे किंवा अन्य कारणास्तव उत्पादकास दंड इत्यादी झाल्यास दंडाच्या रक्कमेची वसुली प्रथम त्यांच्या देयकांमधून करण्यात येईल.

१४)ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळाला मालाचा पुरवठा नियत केलेल्या अंगणवाडयांपर्यंत करावा लागेल. आहाराचा पुरवठा शासनाने ठरवून दिलेल्या प्रथीने व उष्मांकानुसार असणे आवश्यक आहे. वरील प्रमाणे पुरवठा न केल्यास संबधितांचा पुरवठा आदेश रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय समितीस राहील.

१५) अंतीम निवड झालेले पात्र अर्जदार महिला स्वयंसहाय्यता बचत गट यांनी THR चा पुरवठा अखंडित व निविदेतील अटी व शर्तीनुसार केल्यास त्यांचे अर्ज निवड झालेल्या तारखेपासून ३६ महिन्यासाठी ग्राहय राहतील. (अट क्रमांक ४१ च्या अधीन राहुन)

## दंडात्मक कारवाई

१) प्रयोगशाळा तपासणी अहवालानुसार प्रथिने, उष्मांक व सुक्ष्म द्रव्ये यांचे प्रमाण ५ % पेक्षा कमी आढळल्यास तसेच निकृष्ट दर्जाचा किंवा खाण्यास अयोग्य अशा प्रकारच्या मालाचा पुरवठा केला असेल तर असा माल त्यांना स्वखर्चाने त्वरीत बदली करुन द्यावा लागेल. किंवा अशा मालाचा पुरवठा केला म्हणून त्या मालाच्या किंमतीच्या **३ % किंवा दहा हजार** या पैकी जी रक्कम जास्त असेल तेवढा दंड आकारण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद व नागरी भागासाठी बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांना राहतील किंवा निकृष्ट मालाच्या बदली ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळाने दिलेला माल बदलून दिला नाही तर असा पुरवठा केलेल्या मालाची कुठल्याही प्रकारची देयके अदा करण्यात येणार नाहीत. व त्या निकृष्ट मालाऐवजी इतर ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळांकडून खरेदी करण्यात आलेल्या मालाची किंमत संबधित ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळाकडून वसुल करण्यात येईल या शिवाय अशा प्रकरणात पुरवठा करार रद्द करणे किंवा ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळांवर अन्न भेसळ कायद्यांतर्गत किंवा इतर लागु असणाऱ्या कायद्यांमार्फत योग्य तो फौजदारी गुन्हा दाखल करणे किंवा ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळाचे नांव काळयायादीत टाकणे अशा कारवाहीस पात्र राहील.

२) ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळाला उप मुख्य कार्यकारी अधिकारी /बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांचेकडून सुक्ष्म पोषक तत्वांनी Fortification (समृध्द) केलेला ब्लेंडेड पोषक आहाराच्या मागणीनुसार आदेश मिळाल्यापासून ३० दिवसांच्या आंत त्यास नेमून दिलेल्या क्षेत्रातील अंगणवाडयांस THR आहाराचा विनाविलंब व खंड न पडता पुर्ण करावा लागेल. विहित मुदतीत म्हणजे पुरवठा आदेश मिळाल्यापासून ३० दिवसांच्या आत पुरवठा न झाल्यास उशिरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीवर **अर्धा** टक्का प्रती आठवडयाप्रमाणे दंड आकारला जाईल. व त्याची कमाल मर्यादा खालील प्रमाणे असेल.

अ) विहित मुदतीत पुरवठा न केलेल्या मालाची किंमत रुपये एक लाखापेक्षा कमी असेल तर अशा किंमतीच्या **१० % दंड**

ब) विहित मुदतीत पुरवठा न केलेल्या मालाची किंमत रुपये एक लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या **५ % दंड**

३) विहित कालावधीत पुरवठा न केल्यास उत्पादकांचे पुरवठा रद्द करण्यात येईल. व खंडीत पुरवठयापोटी इतर पुरवठेदार यांचेकडून खरेदी करण्यात येईल. व दंडाची रक्कम पुरवठेदारांच्या / संस्थेच्या देयकातून / सुरक्षा अनामत रक्कमेतून वसुल करण्यात येईल.

४) ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळांना मालाचा पुरवठा केल्यानंतर त्याचे नमुने प्रथम NABL प्रयोग शाळेत / आयुक्तांनी निर्देशित केलेल्या प्रयोगशाळेत पाठविण्यात येतील. प्रयोगशाळेतून समाधानकारक अहवाल प्राप्त झाल्यानंतरच मालाची देयके अदा करण्यात येतील. प्रयोगशाळेचे विश्लेषण शुल्क ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळांनी भरावे. अन्यथा ते त्यांचे देयकातून वसूल करण्यात येईल.

५) या संदर्भात उद्‌भवणाऱ्या कोणत्याही विवादास्पद मुद्यांवर निर्णय देण्याचे अधिकार संबधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना ग्रामीण भागासाठी राहील. हा निर्णय संबधीतांना मान्य नसल्यास त्यावरील आयुक्त, महिला व बाल विकास सेवा योजना, पुणे निर्णय अंतीम राहील. तर नागरी भागासाठी आयुक्त, महिला व बाल विकास सेवा योजना, पुणे यांचा निर्णय अंतीम राहील.

वरील सर्व अटी व शर्ती मी / आम्ही काळजीपूर्वक वाचल्या असून त्या मला / आम्हाला आमच्या ग्राम समुदाय / महिला स्वयंसहाय्यता बचत गट /महिला मंडळास मान्य आहेत व त्या / आम्ही आमच्या महिला स्वयंसहाय्यता बचत गटास स्विकृत स्वाक्षरीसह सोबत जोडल्या आहेत.

अर्जदाराची सही व शिक्का

दिनांक :-

स्थळ :-